**संस्थेत वाद असलेल्या शाळेतील मुख्याध्यापकाची वेतननिश्चिती / वेतनश्रेणी / सेवानिवृत्ती वेतन इ. बाबत निर्णय घेण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन शुध्दीपत्रक क्र. वेतन १२१८/प्र.क्र. ८६/१८/टीएनटी-३**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- २५ एप्रिल, २०१८**

**संदर्भ :-** शालेय शिक्षण शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१९१०/(३४९/१०)/प्राशि-३, दिनांक ९ ऑगस्ट, २०१०

**प्रस्तावना :-**

संस्थेमध्ये वाद असल्यास व मुख्याध्यापकांची वेतननिश्चिती संस्थेमार्फत होणे शक्य नसल्यास अशा शाळांमधील मुख्याध्यापकांची वेतननिश्चिती, वेतनवाढी, सेवानिवृत्तीवेतनाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार दिनांक ६.३.२०१० च्या शासन पत्रान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना देण्यात आले आहे. तसेच दिनांक ९.८.२०१० च्या शासन परिपत्रकान्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना देण्यात आले आहे. परंतू सदर परिपत्रकातील परिच्छे क्र. २ मधील ओळ क्र. ६ मध्ये **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्तरावरुन सादर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे,** असा शब्दप्रयोग झाल्यामुळे क्षेत्रीय स्तरावर संभ्रम निर्माण झालेला आहे. सदरचा संभ्रम दूर करण्यासाठी दिनांक ९.८.२०१० च्या परिपत्रकामध्ये दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्रक :-**

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१९१०/(३४९/१०)/प्राशि-३, दिनांक ९.८.२०१० च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. २ मधील ओळ क्र. ६ मध्ये “शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्तरावरुन सादर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे” याऐवजी “शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्तरावरुन निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे”, असे वाचावे.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४२५१३२५२६३४२१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.04.25 13:29:23 +05'30'

**( चारुशीला चौधरी )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१ मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२ मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव
३ आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४ महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
५ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६ संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७ सह संचालक (सुधारणा), संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ शिक्षण संचालक (प्राथमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
९ सर्व विभागीय शिक्षण उप संचालक
१० सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
११ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२ सर्व अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक),
१३ सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४ निवड नस्ती, टीएनटी/३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई